# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**श्री.जानगीर महाराज सह.उपसा सिंचन संस्था ठोरखेडा (ता.मालेगाव, जि.वाशिम) या संस्थेचे थकीत कर्ज माफ करणेबाबत**

**(१) ४२८४ (२३-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.जानगीर महाराज सहकारी उपसासिंचन संस्था, ठोरखेडा (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील थकीत कर्ज माफ करण्याबाबतची मागणी तत्कालीन लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.सहकार मंत्र्यांकडे या संदर्भात दोनवेळा बैठका घेण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर उपसा सिंचन संस्थेचे कर्ज माफ करण्याबाब कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-११-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १५.०७.२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने अमरावती व नागपूर विभागातील उपसा सिंचन संस्थाना कर्जमाफी देण्याचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर केला असता सदर प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयात बायोमेट्रीक मशीन आणि सोलर वॉटर हिटर यंत्रे बंद पडल्याबाबत**

**(२) ५४५१ (१०-४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आश्रमशाळा व वसतीगृहातील विद्यार्थ्यांची तसेच प्रकल्पातील कर्मचा-यांच्या ऑनलाईन हजेरीसाठी मे.अँसव्रेन सिस्टिम ॲण्ड सॉफ्टवेअर प्रा.लि.पुणे या कंपनीच्या माध्यमातून ९८ बायोमेट्रीक मशीन आणि विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळावे यासाठी इको सन एनर्जी कंपनी पुणे या कंपनीच्या माध्यमातून ३९ सोलर वॉटर हिटर यंत्रे एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर अंतर्गत बसविण्यात आलेली असता ९८ पैकी ५५ बायोमेट्रीक मशीन आणि ३९ पैकी ३६ सोलर वॉटर हिटर यंत्रे काही महिन्यांपासून नादुरूस्त असल्यामुळै असल्याची माहिती दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.अेसव्रेन सिस्टिम ॲण्ड सॉफ्टवेअर प्रा.लि.पुणे या कंपनीच्या माध्यमातून चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हयासह राज्यातील ५५२ शासकीय आश्रमशाळा, ५५६ विनाअनुदानित आश्रमशाळा ४४८ वसतीगृह, २९ प्रकल्प कार्यालय अशा प्रकारे ३१६० बायोमेट्रीक मशीन बसविण्यात आले असता काही दिवसानंतर २००० पेक्षा जास्त बायोमेट्रीक मशीन आणि सोलर वॉटर हिटर यंत्रे बंद पडलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय वा त्यात काय आढळुन आले त्यानुसार कोणत्या अधिकारी व कंपन्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :** (१), (२) व (३) याबाबत अनियमीतता आढळून आल्याने सदर प्रकरणी, चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-१, सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.०४.२०१४ च्या शासन निर्णयान्वये चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने चौकशी अहवाल शासनास सादर केला असुन सदर अहवालात सुचविलेल्या शिफारशीस अनुसरुन त्यानुसार संयंत्रे दुरुस्ती करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

सदर निकृष्ट दर्जाचे सोलर वॉटर हिटर संच व बायोमेट्रीक यंत्रणा पुरविणाऱ्या कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकण्यात आले असुन त्यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत महाउर्जा,पुणे तसेच माहिती व तंत्रज्ञान विभाग यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

**रायगड जिल्ह्यातील कोळघर येथे आदिवासी आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याबाबत**

**(३) ६१९० (१०-४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील कोळघर या आदिवासी आश्रमशाळेत अलिबाग, पेण व रोहा परिसरातील ५५० हून अधिक विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळेची पडझाड झालेली इमारत, खोल्यांच्या छप्परातून पावसाळ्यात पाणी गळणे, खिडक्यांना झडपा नसणे, सांडपाणी विल्हेवाटीची व्यवस्था नसणे, मुलांसाठी शौचालयाची व्यवस्था नसणे, लाखो रुपये खर्चुन दोन वर्षापूर्वी बसविलेले चार सौरबंब बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शासकीय आश्रमशाळा, कोळघर येथे अलिबाग, पेण व रोहा परिसरातील ३६४ निवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(२) व (३) शालेय इमारतीची किरकोळ दुरुस्ती करणे, सौरबंबाची दुरूस्ती करणे यासाठी मुख्याध्यापकांना शालेय व्यवस्थापन समितीमार्फत रू.५ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.शाळेच्या इमारतीचे पत्रे बदलण्यात आले आहेत.दरवाजे खिडक्यांची दुरूस्ती करण्यात आली आहे.शाळेच्या आवारामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल खोदला आहे.शालेय आवाराची साफ सफाई करण्यात आली आहे.

शासकीय आश्रमशाळा, कोळघर येथील इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.नविन इमारतीत एकुन १६ वर्गखोल्या व २६ शौचालय आहेत.सध्यस्थितीत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून विद्युत जोडणीचे काम सुरू असुन काम पुर्ण होताच इमारत हस्तांतरित केली जाणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वीटभट्ट्यांवरील काम करणा-या आदिवासी कुटूंबातील मुलामुलींना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

**(४) ९४९९ (१०-४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीटभट्ट्यांवर काम करणारे आदिवासी कुटूंब उरनिर्वाहासाठी स्थलांतरीत होवून उपजीवीकेसाठी त्यांना अन्यत्र जावे लागत असल्याने त्यांच्या मुलामुलींना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी मुलामुलींच्या मोठ्याप्रमाणात होणा-या शैक्षणिक गळतीकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, प्रश्न भाग क्र.१ व २ बाबत शासनाने चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे विभागातील शासकीय आश्रमशाळा आणि वसतीगृहातील गैरकारभाराच्या चौकशीच्या प्रलंबित प्रकरणांबाबत

**(५) १३६९२ (३०-११-०००२). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारितील ठाणे विभागांतर्गत येणा-या शासकीय आश्रमशाळा आणि वसतीगृहाच्या गैरकारभारातील दोषी अधिकारी आणि कर्मचारी यांच्या विभागीय चौकशीची सुमारे ४१ प्रकरणे गेली चार वर्षे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणीची चौकशी शासनाकडून करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदरहू प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) : (**१)हे खरे आहे.

(२) अपर आयुक्त हे वर्ग-३ नियुक्ती प्राधिकारी आहेत. दोषी कर्मचा-यांची विभागीय चौकशी करण्याचे संपुर्ण अधिकार त्यांना आहेत. त्याच्यांकडुन विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी विभागातर्फे चालविण्यात येणा-या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचा पोषण आहार पुरविला जात असल्याबाबत**

**(६) १३९८४ (१०-४-२०१५)). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विभागातर्फे चालविण्यात येणा-या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना ठेका / कंत्राट पध्दतीने देण्यात येणारा पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याचे तसेच प्रशासनाने प्रमाणित केलेल्या सुचीनुसार पुरविला जात नसल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निकृष्ट दर्जाचे अन्न देणा-या ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर ठेकेदार पध्दती बंद करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणा-या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना नास्ता, दोन वेळचे जेवण, अंडी, केळी, दुध पुरविण्यात येते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी आश्रमशाळेत निकृष्ट दर्जाचे सोलर वॉटर हिटर पुरविण्यात आल्याबाबत**

**(७) १३९८५ (१०-४-२०१५). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच नाशिक जिल्ह्यात आदिवासी विभागामार्फत शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांसाठी आंघोळीसाठी गरम पाणी मिळावे याकरिता प्रत्येक आश्रमशाळेत सुमारे ५.०० लक्ष रुपये खर्च करुन सोलर वॉटर हिटर संच बसविण्यात आले आहेत, परंतु सदरहू वॉटर हिटर संच बसविल्यापासून बंद असून हिवाळ्यात विद्यार्थ्यांना थंड पाण्याने स्नान करावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त सोलर वॉटर हिटर खरेदी व बायोमॅट्रीक यंत्रणा बसविण्याच्या प्रकरणामधील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या समितीने दिनांक १४ जानेवारी, २०१५ पर्यंत शासनास चौकशीचे अहवाल सादर करणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निकृष्ट दर्जाचे सोलर वॉटर हिटर संच पुरविणा-या ठेकेदारावर व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर प्रकरणी, चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-१, सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६.०४.२०१४ च्या शासन निर्णयान्वये चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीने अहवालात सुचविलेल्या शिफारशीस अनुसरुन पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.७/८/२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, सर्व अपर आयुक्त व सर्व प्रकल्प अधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
(३) सदर निकृष्ट दर्जाचे सोलर वॉटर हिटर संच पुरविणाऱ्या कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकण्यात आले असुन त्यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत महाउर्जा, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

___

**राज्यातील गटई काम करणाऱ्या कामगारांचे प्रश्न सोडविण्याबाबत**

**(८) ६६०२९ (२७-०१-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गटई कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी चर्मकार संघटनांनी मा.सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे दिनांक २८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास तसेच वारंवार निवेदनाव्दारे मागण्या केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी चर्मकार समाजाने केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (१८-११-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.
(२) संघटनेने त्यांच्या निवेदनात अनेक मागण्या केलेल्या असून त्यावर आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

___

**नाशिक जिल्हा परिषदेच्या जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर केलेल्या निधीबाबत**

**(९) ७०८२१ (२७-०१-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या २७०२ लेखा शीर्षाखाली जिल्हा नियोजन समितीकडून २६ कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेचे पदाधिकारी व सदस्य यांच्या शिष्टमंडळाने या संदर्भात दिनांक २९ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना भेटून जिल्हा परिषदेला जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर केलेला २७०२ लेखा शीर्षाखालील आदिवासी उपाययोजनेचा २६ कोटीचा निधी परस्पर जलयुक्त शिवार अभियानांकरिता वर्ग करण्यात येऊ नये अशा मागण्याचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदन देण्याची कारणे काय आहेत व या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :** (१) आदिवासी जिल्हा वार्षिक उपयोजना सन २०१६-१७ करीता नाशिक जिल्हा परीषदेस लहान पाटबंधारे - लेखाशिर्ष २७०२ खाली रु.२३ कोटी इतका नियतव्यय ठेवण्यात आलेला होता.

(२), (३) व (४) होय, अशा प्रकारचे निवेदन विभागीय आयुक्त, नाशिक यांना देण्यात आले होते. लेखाशिर्ष २७०२ खाली तरतुद करण्यात आलेल्या रु.२३.०० कोटी नियतव्ययापैकी रु.१०.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या आदेशानुसार जलयुक्त शिवार अभियानाकरीता वर्ग करण्यात आला होता.

---

## गडचिरोली जिल्हयातील शैक्षणीक संस्थानी बोगस विद्यार्थी दाखवून शिष्यवृत्तीमध्ये केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१०) ७१०३५ (२७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील शैक्षणिक संस्थानी सन २००९-१० पासून हजारो बोगस विद्यार्थी दाखवून अधिका-यांच्या संगनमताने शिष्यवृत्तीमध्ये सुमारे ७५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे सन २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,वरिष्ठ अधिका-यांच्या बनावट सहया करुन या बदल्या करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले व यात दोषी असलेल्या संबधितासह शैक्षणिक संस्थेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच यामध्ये कोणकोणत्या शैक्षणिक संस्था सामिल असून किती रकमेचा गैरव्यवहार करण्यात आला आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांच्यामार्फत तसेच विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(४) व (५) या प्रकरणी विशेष चौकशी पथकाच्या अहवालानुसार गुन्हे दाखल केलेल्या ६ संस्थांची वसुलपात्र ठरवलेली रक्कम रु.४,०२,६७,२८५/- इतकी असून या संस्था पुढीलप्रमाणे आहेत. श्री.साईराम बहुउद्देशिय ग्रामिण विकास संस्था, चंद्रपूर, संकल्पसिध्दी बहुउद्देशिय विकास संस्था, गडचिरोली, गुरुनंदन महिला कल्याणकारी बहुउद्देशीय मंडळ, चंद्रपूर, मा.जिजाऊ बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर, ज्ञानदिप बहुउद्देशिय शिक्षण संस्था, चंद्रपूर, अर्जुन ग्रामिण विकास संस्था वर्धा यासंस्थेकडून वसूलपात्र रक्कम वसूल करण्यात येत आहे

---

**भारत सरकार शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी / परीक्षा फी या दोन योजनासांठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(११) ७१०४० (२७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील सहाय्यक समाजकल्याण आयुक्त या कार्यालयाकडे सन २०११-१२ मध्ये प्रलंबित शिष्यवृत्ती अर्जाची संख्या ५ हजार ७९५ होती ती सन २०१४-१५ मध्ये १२ हजार ०४६ झाली असुन शिक्षण फी व परीक्षा फी योजनेची ही प्रलंबित संख्या दोन हजार ५०५ हून ५ हजार ८१६ अर्जावर पोहचली असल्याची माहिती माहे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे,
(२) असल्यास, भारत सरकार शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी/परीक्षा फी या दोन योजनासांठी म्हणून अर्ज केलेल्या हजारो विद्यार्थ्यांचे अर्ज सहाय्यक समाजकल्याण आयुक्तांकडे प्रलंबित असून यातील अनेक अर्जातील महत्वाचे कागदपत्रे गहाळ झाले असल्यामूळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणीक वर्ष धोक्यात आले आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीमध्ये काय आढळून आले आणि संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही,
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक विभागातील शिष्यवृत्ती व फ्री शिपसाठी आलेल्या अर्जांबाबत

**(१२) ७९३९४ (२०-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागातील धुळे, जळगांव, नंदूरबार, अहमदनगर येथील शिष्यवृत्तीसाठी २ लाख ५६ हजार २४४ आणि फ्री शिपसाठी २८ हजार १८५ अशा एकूण २ लाख ८४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षाचे शैक्षणिक वर्ष संपण्यासाठी केवळ तीन महिने शिल्लक असतांना उपरोक्त अर्जापैकी २ लाख ३० हजार ९७० अर्ज अद्यापही महाविद्यालय आणि जिल्हा पातळीवर प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अर्ज प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२०-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

(३) जिल्हास्तरावरील अर्ज तरतूदी अभावी तसेच महाविद्यालय स्तरावरील अर्ज हे महाविद्यालयांकडून विहित कालावधीत बी स्टेटमेंट प्रस्ताव सादर न करण्यात आल्यामुळे प्रलंबित होते.

(४) सद्य:स्थितीत, सन २०१६-१७ वर्षातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित राहिलेले शिष्यवृत्तीचे २२६५ अर्ज व फ्रीशीपचे २९२ अर्ज निकाली काढण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिष्यवृत्ती वाटपात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१३) ८११८० (२१-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३७५२ शिक्षण संस्था शिष्यवृत्ती गैरव्यवहाराशी संबधित असून त्यापैकी २८०० शिक्षण संस्थांच्या चौकशीत १४१५ कोटी रूपयांचा गैरव्यवहार निदर्शनास आला असून ही रक्कम संबधित संस्थाचालकांकडून वसूल करण्यात यावी अशी शिफारस डॉ.व्यंकेटेशम यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त विशेष तपास पथकाच्या अंकेक्षकांनी केली असल्याची माहिती दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील जवळपास २० हजार संस्थांचे अजून अंकेक्षण व्हायचे असल्याने हा गैरव्यवहाराचा आकडा दुप्पटीने वाढू शकतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अनेक महाविद्यालये कागदोपत्री सुरू असून १ हजार ४५१ महाविद्यालये सन २०१६-१७ मध्ये बंद झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने उच्च स्तरीय अधिकाऱ्यांमार्फत सखोल चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-११-२०१८) :** (१) अंशत: होय.
(२) नाही, विशेष चौकशी पथकाने समाज कल्याण विभागांतर्गत येणाऱ्या १२,६७९ संस्थांपैकी १७०४ संस्थांची तपासणी केलेली असली तरी, उर्वरीत शैक्षणिक संस्थांबाबत सर्व ३५ जिल्हा सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयांचे लेखापरीक्षण केलेले आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव परिमंडळात अभियंते व तांत्रिक कामगारांसह विविध विभागातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(१४) ८४१५३ (२८-०४-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील जळगाव परिमंडळात अभियंते व तांत्रिक कामगारांसह विविध विभागातील एकूण २ हजार ३०० पदे रिक्त असल्याने सदर कर्मचा-यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिमंडळात १४ लाख ग्राहक असून १ लाख ग्राहकांमागे केवळ तीस कर्मचारी कार्यरत असल्यामुळे ग्राहकांना सेवा देण्यास विलंब लागत असून थकबाकी वसुलीवरही त्याचा परिणाम होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामाचा ताण पाहता व थकबाकी वसूली जलद होण्याकरिता रिक्त असलेली पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.
महावितरण कंपनीच्या जळगांव परिमंडळात दि. २१ फेब्रुवारी, २०१७ च्या सुमारास अभियंते व तांत्रिक कामगारांसह विविध विभागातील १५५७ पदे रिक्त होती.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न भाग-१ मधील १५५७ रिक्त पदांपैकी अभियंता व तांत्रिक संवर्गातील बरीच रिक्त पदे सरळसेवेने, पदोन्नतीने व विनंती बदलीने माहे मे व जून, २०१७ मध्ये भरण्यात आलेली आहेत. उर्वरित तांत्रिक संवर्गातील रिक्त पदे बाहयस्त्रोत पध्दतीने भरण्यात येत आहेत.

---

**राज्यातील शेतक-यांना दिलेल्या कर्जमाफीच्या धर्तीवर**
**मागासवर्गीयांची कर्जे माफ करण्याबाबत**

**(१५) ८५७६२ (१८-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांना दिलेल्या कर्जमाफीच्या धर्तीवर शेतक-यांप्रमाणेच महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, लिडकॉम यांच्याकडील गोरगरिब मागासवर्गीयांची कर्जे माफ करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ च्या चौथ्या आठवड्यात तसेच वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्यायमंत्री यांचेकडे मागण्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यशासनाच्या विविध महामंडळामार्फत मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, आणि अल्पसंख्यांकांना दिले गेलेल्या कर्जाच्या कर्ज वसूलीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, वसंतराव नाईक महामंडळात लाभार्थ्यांना कर्ज वाटप करताना अनियमितता झाल्याचे महालेखा परिक्षकांनी त्यांच्या नुकत्याच सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महामंडळाकडून नियमीत कर्जपुरवठा आणि पाठपूरावा नसल्यामुळे लाभधारकांचे व्यवसाय मोडकळीस आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणताही निर्णय घेतलेला तसेच राज्यातील गोरगरिब मागासवर्गीयांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आवश्यक उपाययोजना तयार करुन सदर प्रकरणी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-११-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) कर्ज वसुली अल्प आहे.
(३) होय. संबधितांविरुद्ध आवश्यक कार्यवाही सुरु आहे.
(४) हे खरे नाही.
(५) कर्जमाफीचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**आदिवासीनां विभागांतर्गत योजनेचा लाभ मिळण्यासाठी विभागाकडून २१ हजार उत्पन्न मर्यादेचा निकष असल्याबाबत**

**(१६) ९४३४२ (०९-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासीनां कोणत्याही योजनेचा लाभ मिळण्यासाठी विभागाकडून मागील ३० वर्षापासून २१ हजार उत्पन्न मर्यादा निकष असल्याने या निकषामध्ये अनेक आदिवासी नागरिक बसत नसल्याचे दिनांक १ जुन, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उत्पन्न मर्यादा कमी असल्याने अनेक गरजू आदिवासींना शासनाच्या अनेक योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून उत्पन्न मर्यादा वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२०-११-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यातील आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी अर्थसहाय्य या कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांसाठी सन १९९३-९४ पासून उत्पन्न मर्यादा रु.२५,०००/- हजार इतकी होती. तथापि जास्तीत जास्त आदिवासी शेतकऱ्यांना लाभ देण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय,कृषी विभाग दि.९/०८/२०१७ अन्वये उत्पन्न मर्यादा रु.१,५०,०००/- इतकी वाढविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खरीप पिक विमा २०१७ योजनेंतर्गत विमा भरलेल्या शेतकऱ्यांना**

**पिक विमा नुकसानीची अग्रीम रक्कम देण्याबाबत**

**(१७) ९४९६० (२२-९-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात सन २०१७ मध्ये खरीप पिकाचे उत्पादनात पावसाभावी ५०% पेक्षा अधिकची घट येणार असल्यामुळे राष्ट्रीय पीक विमा खरीप २०१७ योजनेंतर्गत पीक विमा रक्कम भरलेल्या शेतकऱ्यांना सदर पीक विमा योजनेनुसार पीक विमा नुकसानीची आगाऊ / अग्रिम २५% नुकसान भरपाई देण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकाप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे निवेदनाव्दारे दिनांक १३ ऑगस्ट, २०१७ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर आपदग्रस्त व पीक विमा नियमानुसार पात्र असलेल्या शेतकऱ्यांना २५% अग्रिम विमा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार पूर, पावसातील खंड, दुष्काळ इ. बाबींमुळे अपेक्षित उत्पन्नामध्ये उंबरठा उत्पन्नाच्या ५० टक्केपेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर, नुकसान भरपाईच्या प्रमाणात विमाधारक शेतकऱ्यांना २५ टक्के मर्यादेपर्यंत आगाऊ रक्कम देण्यात येते. तथापि, उपरोक्त प्रमाणे प्रतिकूल परिस्थती सर्वसामान्य काढणी वेळेच्या १५ दिवस अगोदर आली तर सदरची तरतूद राहणार नाही. खरीप पीकाची काढणी सुरु झाली असल्याने जिल्हयामध्ये सदरची तरतूद लागू झालेली नाही व जिल्हा प्रशासनाकडून त्यामुळे कोणतीही अधिसूचना काढण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंबिवली (जि. ठाणे) येथील उस्मा पेट्रोल पंपाजवळील पाच भूखंड एमआयडीसीने मार्बल व्यवसायाकरिता उपलब्ध करून दिल्याबाबत.**

**(१८) ९८०५७ (०३-०१-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील उस्मा पेट्रोल पंपाजवळील पाच भूखंड नाममात्र दराने मार्बल व्यवसायाकरिता एमआयडीसीने उपलब्ध करून दिल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी निसर्ग उद्यान उभारण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाममात्र भावाने भूखंड उपलब्ध करून देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच सदर ठिकाणी निसर्ग उद्यान उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

मार्बल व्यवसाय-सिरॅमिक टाईल्स कटींग आणि पॉलीशिंग हा उद्योग औद्योगिक प्रयोजनात येत असल्याने उस्मा पेट्रोल पंपाजवळील भूखंड महामंडळाच्या संचालक मंडळाचा ठराव व MMC च्या मान्यतेनुसार वाणिज्यिक भूखंडाचे औद्योगिक रुपांतरण करुन प्रचलित औद्योगिक दराने उद्योग विस्ताराकरीता भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. यापैकी तीन भूखंड हे मार्बल व्यवसायाकरीता आणि एक भूखंड प्रिटींग प्रेस या व्यवसायाकरीता वाटप करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलवाडी (ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद) येथील अदानी ग्रुपच्या सौरउर्जा प्रकल्पासाठी शेतक-यांना अल्प मावेजा दिल्याबाबत**

**(१९) ९८१७५ (२९-१२-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेलवाडी (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील अदानी ग्रुपच्या सौरउर्जा प्रकल्पासाठी बेलवाडी ते नळदुर्गपर्यंत वीजेचे खांब शेतक-यांच्या शेतात उभे करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंपनीचे संबंधित अधिकारी व दलालांनी शेतात खांब उभे करण्यासाठी शेतक-यांना अल्प मावेजा दिला असून वाटपात गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच शेतक-यांना नियमाप्रमाणे योग्य मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-११-२०१८)** : (१) अदानी कंपनीच्या मे.परमपुज्य सोलर एनर्जी प्रा.लि. च्या २० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पासाठी बेलवाडी, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद ते नळदुर्ग उपकेंद्र या दरम्यान दुहेरी विद्युत परिपथ तारा (double circuit line) चे काम सप्टेंबर, २०१७ मध्ये सुरू केले आहे.

(२) व (३) सदर कंपनीच्या अहवालानुसार बेलवाडी ते नळदुर्ग उपकेंद्रापर्यंत दुहेरी विद्युत परिपथ तारा (double circuit line) च्या कामातील ५० टक्के काम शेतकऱ्यांच्या पडीक व नापीक जमिनीमध्ये केले असून काही खांब शेतजमिनीवर उभारण्यात आलेले आहेत. तथापि शेतकऱ्यांना यथोचित जमिनीचा मोबदला दिला आहे. जमिन मोबदल्याबाबत संबंधित शेतकऱ्यांच्या काही हरकती स्थानिक महसूल यंत्रणेकडे नोंदविलेल्या असल्यास, त्याच्यावर नियमोचित कार्यवाही करण्याच्या जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील दलित आदिवासी, भटके-विमुक्त, ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्याबाबत

**(२०) १०१५८५ (२६-१२-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक वर्ष सुरु होवून पाच महिने उलटूनही विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या दलित आदिवासी, भटके-विमुक्त, ओबीसी, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण संस्थांचे शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या सरकारच्या निर्णयावरुन शिक्षण संस्थांमार्फत विद्यार्थ्यांचे अर्जच पाठविण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार दलित आदिवासी, भटके-विमुक्त, ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-११-२०१८)** : (१) अंशतः खरे आहे,

(२) हे खरे नाही,

(३) व (४) सन २०१७-१८ मध्ये महाडीबीटी पोर्टल पुर्णपणे कार्यान्वित होवू न शकल्याने पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज ऑफलाईन स्विकारुन त्यांचे शैक्षणिक लाभ त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यावर अदा करण्याचा निर्णय दिनांक २९.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. तद्नंतर, मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याचिका क्र.४०८/२०१८ मध्ये दिलेल्या

निर्णयानुसार सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये, ज्या महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना संबंधित विभागांकडील मागासप्रवर्ग (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग) आणि आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम अद्याप प्राप्त होवू शकलेली नाही, अशा महाविद्यालय/शैक्षणिक संस्थांना, त्यांच्याकडील प्रवेशित पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांपैकी आज (दिनांक १८.५.२०१८) अखेर लाभ अदा केलेले विद्यार्थी वगळुन, उर्वरीत विद्यार्थ्यांची अनुज्ञेय/पात्र अभ्यासक्रमांसाठी देय होणारी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेला ऑफलाईन पध्दतीने अदा करण्याचा निर्णय दिनांक १७.५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला व त्याची अंमलबजावणी सर्व संबंधित विभागांकडून करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**समाजकल्याण विभागामार्फत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी जात पडताळणी व जात व अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याबाबत**

**(२१) १०२०९७ (१३-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागामार्फत मॅट्रिकोत्तर विदयार्थांना शिष्यवृत्तीच्या अर्जात जात पडताळणी तर अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पाल्यांना दिल्या जाणाऱ्या जात व अधिवास असे नवे प्रमाणपत्र मागविण्यात आले असून गेल्या वर्षापर्यंत या कागदपत्राची मागणी केली जात नव्हती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विज्ञान शाखेच्या विदयार्थांकडून वर्ग १२ वी ला शाळेमार्फत जात पडताळणीसाठी अर्ज पाठविले जात असून आधिवास प्रमाणपत्रासाठी प्रौढत्व असणे आवश्यक असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ नुसार मॅट्रीकोत्तर विदयार्थांसाठी जात पडताळणी व अधिवास प्रमाणपत्राची अट शिथिल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२०-११-२०१८) :** (१) हे खरे नाही, भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृती साठी सन २००४-०५ पासून जातीचा दाखल असणे आवश्यक आहे. तर अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेल्या अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठीची शिष्यवृत्ती ही जातीच्या दाखल्याच्या आधारे देण्यात येते व त्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांकडून ते अस्वच्छ व्यवसायात काम करीत असल्याचे हमीपत्र घेण्यात येते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची**
**सहकार कलम ८८ नुसार चौकशी करण्याबाबत**

**(२२) १०२७७९ (१३-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची सहकार कलम ८८ नुसार चौकशी करण्याचे आदेश जिल्हा उपनिबंधक यांनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या सन २०१५-१६ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी दिनांक १०.१०.२०१६ च्या आदेशान्वये चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती.

सदर अधिकाऱ्याने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने बँकेस झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती दिनांक १.८.२०१७ रोजीच्या आदेशान्वये करण्यात आली असून पुढील चौकशी संबंधीत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भूविकास बँकेतील कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत**

**(२३) १०३६७२ (१३-०७-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूविकास बँक बंद करून कर्मचाऱ्याच्या सन २००८ पासून ग्रॅज्युईटी, अखर्चित रजेचा वेतन तसेच शासन आदेशानुसार निवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन शासनाकडे थकीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेची स्थावर मालमत्ता २००० कोटीची आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कामावरून कमी केलेल्या कर्मचाऱ्यांना थकीत वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) व (२) नाही.

भूविकास बँक कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर देणी राज्य शासनाकडे थकीत नसून ती संबंधीत जिल्हा भूविकास बँकेकडे थकीत आहेत.

राज्यातील भूविकास बँकांच्या ६० मालमत्ता असून त्यांची अंदाजित किंमत रु.५५५.६१ कोटी आहे.

(३) भूविकास बँकाबाबत दिनांक २४ जुलै, २०१५ रोजीच्या धोरणात्मक निर्णयानुसार, कर्मचाऱ्यांची देणी कर्जवसूली व मालमत्ता विक्री यामधून उपलब्ध होणाऱ्या निधीतून अदा करावयाची आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरातील संजय गांधी निराधार योजनेंतर्गत**
**लाभार्थ्यांना निधी मिळाला नसल्याबाबत**

**(२४) १०४०७२ (१३-०७-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात संजय गांधी निराधार योजनेंतर्गत ६०० रुपयांची आर्थिक मदत दर महिन्याला लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केली जात असून मात्र २० हजार लाभार्थ्यांना गेल्या सहा महिन्यांपासून निधीच मिळालेला नसल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ज्येष्ठ नागरिकांनी वारंवार संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन देखील याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार लाभार्थ्यांना अनुदान देण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्हयात विशेष सहाय्य योजनांचे माहे जुलै, २०१८ पर्यंत लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिव्यांग शाळांना पदमान्याता देवून शाळातील कर्मचा-यांचे वेतन सुरु करण्याबाबत**

**(२५) १०४४२५ (१३-०७-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेल्या १५ वर्षापासून शासनाच्या कोणत्याही अनुदानाशिवाय दिव्यांग शाळा चालविल्या जात असून शासनाच्या अनेक विभागातर्फे विविध तपासण्या झाल्यानंतर शासनाने तोंडी आणि लेखी उत्तर दिल्यानंतरसुद्धा अद्याप कोणत्याही आश्वासनांची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दिव्यांगाच्या (अपंग) १२३ शाळांना शासनाकडून त्वरीत पदमान्यता देण्यासाठी व दिव्यांग शाळातील कर्मचाऱ्यांचे वेतन सुरु करण्यासंबधी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक ८.४.२०१५ अन्वये कार्यरत असलेल्या १२३ शाळांना पद मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यातील विविध आर्थिक विकास महामंडळाचे कर्जाचे प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित असल्याबाबत**

**(२६) १०६९३८ (१९-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अण्णाभाऊ साठे, वसंतराव नाईक, महात्मा फुले, संत रोहीदास चर्मकार विकास सहकारी विविध आर्थिक विकास महामंडळाचे कर्जाचे प्रस्ताव सरकारी बँकांमध्ये गेल्या ८ महिन्यात प्रलंबित असल्याने बेरोजगारांचा प्रश्न गंभीर बनल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकीकडे तरुणांना स्वयंरोजगारास चालना देण्याचे शासनाचे धोरण असून दुसरीकडे मात्र महामंडळाने स्वत:चे कर्ज प्रकरणे देण्याचे बंद केले आहेत, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) बँकेकडे सादर करण्यात आलेल्या व अद्‍याप मंजुरी न मिळालेल्या कर्ज प्रकरणांवर कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही

---

**राज्यातील साखर कारखान्यांना सहवीज निर्मितीसाठी घातलेल्या अटीबाबत**

**(२७) १०७१८९ (१७-०४-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखान्यांना सहवीज निर्मितीसाठी १० लाख अनामत रक्कम २० लाखांची गॅरंटीची अट माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घालण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी साखर कारखानदारांत असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-११-२०१८) :** (१) केंद्र शासनाच्या ऊर्जा मंत्रालयाच्या दि.३.०८.१७ रोजीच्या सौर ऊर्जा प्रकल्पधारकांकडून स्पर्धात्मक निविदेव्दारे वीज खरेदी करण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्वानुसार उसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्पधारकांकडून प्रकल्प उभारणी खर्चाच्या २ टक्के इतकी अनामत व प्रकल्प उभारणी खर्चाच्या ५ टक्के इतकी बँक गॅरंटी निर्धारित केली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रीया करताना अनामत रक्कम ही रू. १० लक्ष प्रती मेगा वॅट व परफॉन्मन्स बँक गॅरंटी २० लक्ष प्रती मेगा वॅट इतकी ठरविण्यात आली आहे.
(२) व (३) सदर विषया संदर्भात घेण्यात आलेल्या निविदा पूर्व बैठकीत निविदाकारांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने अनामत रक्कम रू. १ लक्ष प्रती मेगा वॅट व परफॉन्मन्स बँक गॅरंटी रू.५ लक्ष प्रती मेगा वॅट इतकी करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर, (जि.सोलापूर) येथे नवीन कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबत**

**(२८) १०९७१६ (०१-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे नवीन कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबत अनेक दिवसापासूनची मागणी असून यासाठी लागणारी विस्तीर्ण अशी १२० एकर जमीन उपलब्ध असून महाविद्यालयासाठी लागणारी सर्व यंत्रणा उपलब्ध असल्याचे विनंती पत्रही शासनाकडे लोकप्रतिनिधी यांनी अनेकदा दिले असल्याचेही निदर्शनास येत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंढरपूर (जि.सोलापूर) येथे कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक ३० ऑगस्ट, २००४ रोजी वा त्यादरम्यान महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडे दाखल करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) पंढरपूर, (जि.सोलापूर) येथे नवीन कृषि महाविद्यालय स्थापन करणेबाबत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठ नियुक्त समितीने दोन वेळा प्रस्तावित कृषि

महाविद्यालयाच्या ठिकाणी भेट देऊन नविन महाविद्यालयाकरीता जमीन, इमारती व इतर शैक्षणिक सोयी सुविधांची पाहणी करुन अहवाल विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेकडे सादर केला. दि. ४/८/२०१४ रोजी झालेल्या ३०६ व्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ०४/३०६, (दि. ०४/०८/२०१४) अन्वये मंजुर करण्यात येवून, कृषि परिषदेच्या दि. १३/२/२०१५ रोजी झालेल्या ९० व्या बैठकीतील ठराव क्र. १६/९०/२०१५ अन्वये मान्यता देवून प्रस्ताव शासनाकडे शिफारस करण्यात आलेला आहे.

शासनाने दि. ३०/६/२०१५ रोजी कळविल्यानुसार प्रस्तावित कृषि महाविद्यालयासाठी जमिनीबाबतची माहिती नाही. जेथे शासकीय जमिन लवकर उपलब्ध होईल तेथे करावी असे प्रस्तावात नमूद केले आहे. त्यानुसार कृषि विभागाची जमिन उपलब्ध करणेविषयी कृषि आयुक्तालयाचा ना हरकत दाखला मिळणेसाठी, जमीन हस्तांतरण केल्यास विभागाचे कामकाजावरील परिणामाबाबत व तदअनुषंगिक बाबीसंदर्भातील माहिती/खुलासा विद्यापीठास व शासनास सादर करण्याबाबत मा. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना विनंती करण्यात आली होती. तथापि अद्याप याबाबतचा अहवाल अप्राप्त आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषिपंपासाठी ३०० मेगावॅटचे सौर उर्जा प्रकल्प उभारण्याबाबत

**(२९) १११४२१ (०४-०४-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषिपंपाना वीजपुरवठा करण्यासाठी महानिर्मितीने राज्यात ३०० मेगावॅटचे सौरऊर्जा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर उभारण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१७ च्या दुस-या आठवडयात घेतलेला असून हा करार २५ वर्षासाठी करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) तसेच यासाठीच्या कराराच्या अटी व शर्ती काय असणार आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-११-२०१८) :** (१) व (२) "मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना" अंतर्गत महानिर्मितीव्दारे टप्पा २ अंतर्गत एकूण ३०० मेगा वॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्याबाबतची निविदा प्रसिध्द केली असून, त्यापैकी २०० मेगा वॅट क्षमतेच्या प्रकल्पाकरीता यशस्वी निविदाधारकांना इरादापत्र देण्यात आले आहे. महावितरणव्दारा महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या मंजूरी नंतर १५० मेगा वॅट क्षमतेचा वीज करार करणे नियोजित आहे.

(३) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजने अंतर्गत / सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर उभारण्यात येणाऱ्या सौर ऊर्जा प्रकल्पाबाबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील प्रमुख अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:-

१) विकासक आवश्यक चाचणी पत्र, इलेक्ट्रिकल इन्स्पेक्टर (GoM) प्रमाणपत्र तसचे MEDA व MSEDCL ऑफिसर्स कडून संबंधित प्रमाण पत्र मिळवेल.

२) वीज जोडणी फी, जमीन दस्त फी व जमीन पोट भाडेपट्टा दस्त फी दत्यादी विकासक अदा करेल.

३) विकासक प्रकल्पास आवश्यक सर्व मान्यता संबंधितांनाकडून मिळवेल.

४) तसेच विकासक प्रकल्प सहाय्यक व बांधणीसाठी लागणारी वीज महावितरणकडून प्रचलित नियम व अटीनुसार घेईल.

५) १० मे.वॅ.पर्यंतचे सौर प्रकल्प ११ के.व्ही निष्कासन वाहिनीस जोडले जातील.

६) प्रकल्पाचा करार प्रकल्प कार्यान्वित होण्याच्या दिनांकापासून पुढील २५ वर्षासाठी लागू राहील.

७) विकासकाने Notice to proceed (NTP) च्या दिनांकापासून १८ महिन्याच्या कालावधीत प्रकल्प कार्यान्वित करावा.

८) निश्चित न्यूनतम वीज दर (rate received after reverse bidding) या संपूर्ण २५ वर्ष (कराराच्या कालावधीसाठी) स्थिर राहील.

९) विकासकानी SLDC च्या सूचनांचे पालन करावे.

१०) विकासक सौर प्रकल्प, वीज निष्कासन माहिती व इतर उपकरणाची २५ वर्षापर्यंत देखभाल करेल.

---

**ममुराबाद (जि. जळगाव) येथील शेतक-यांसाठी सुरु असलेल्या केळी संशोधन केंद्राबाबत.**

**(३०) १११६०५ (२८-११-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ममुराबाद (जि.जळगाव) येथे शेतक-यांसाठी केळी संशोधन केंद्र सुरु केलेले असून शेतक-यांना कोणतीही मदत अथवा नवीन संशोधन अद्याप त्यांच्यामार्फत करण्यात आलेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळी संशोधन केंद्रात मागील ५ वर्षामध्ये कोणते नवीन संशोधन करण्यात आलेले आहे काय,

(३) असल्यास, सदर संशोधन केंद्रामार्फत आतापर्यंत किती शेतक-यांना फायदा झालेला आहे व त्यांची नावे काय आहेत,

(४) असल्यास, शेतक-यांना कोणतीही मदत अथवा नवीन संशोधन त्यांच्यामार्फत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) ममुराबाद येथे शेतकऱ्यांसाठी खालील नवीन संशोधन करण्यात आलेले आहे.

१. ग्रॅड नैन, या केळीच्या सुधारित जातीची महाराष्ट्रात लागवडीसाठी शिफारस (२०१२)

२. केळी पासून पहिला खोडवा पिक घेण्यासाठी पहिल्या एक पिल राखण्याची शिफारस (२०१४)

३. फुल किडींच्या नियंत्रणासाठी फि प्रानील किटनाशकाच्या फवारणीची (२०१४)

४. करपा सिगाटोका रोगाच्या नियंत्रणासाठी खनिज तेला बरोबर प्रॉपिकोनाझल बुरशी नाशकाची फवारणी (२०१५)

५. मृग बाग व कांदेबागा शिवाय जळगांव नंदुरबार व धुळे जिल्हयांसाठी फेब्रुवारी महिन्यात नविन लागवड हंगामाची शिफारस २०१६

६. केळी पिकवण्यासाठी किफायदशीर केळी पिकवण तंत्रज्ञानाची शिफारस (२०१६)

७. ठिबक फर्टीगेशन द्वारे मोनोअमोनियम फॉस्फेट (१२.६१.०) या खताची मात्रा केळी पिकाला देण्याची शिफारस (२०१६)

८. लोह व जस्त सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी तसेच जमिनीद्वारा केळी पिकाला देण्याची शिफारस (२०१६)

९. केळी खोडवा पिकाला ठिबकद्वारे फर्टीगेशन नत्र, स्फुरद व पालाशाची मात्रा देण्याची शिफारस (२०१७)

१०. सेंद्रिय केळी लागवडीसाठी विविध सेंद्रिय माध्यमातून अन्नद्रव्य देण्याची व विविध हिरवळीचे पिके घेण्याची शिफारस (२०१७)

११. केळीच्या अधिक उत्पादनासाठी ठिबकद्वारे खतांची मात्रा गणिमाप्रमाणे ३० मायक्रोन चंदेरी काळा पॉलीथीन तसेच लोह, जस्त व सल्फेट ऑफ पोटॅश या अद्यावत तंत्रज्ञानाची शिफारस (२०१४)

१२. बी.आर.एस. २०१३-३ या केळीच्या बुटक्या व ग्रॅंड नैन पेक्षा २ महिन्यांनी लवकर तयार होणाऱ्या वाणाची पुर्व प्रसारित करण्याची शिफारस (२०१७)

(३) संशोधन केंद्रामार्फत विकसीत केळी उत्पादन तंत्रज्ञानाच्या आतापर्यंत असंख्य शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे.

(४) केळी संशोधन केंद्र, जळगाव मार्फत शेतक-यांना मार्गदर्शन तसेच संशोधनासाठी महाराष्ट्र शासनाकडून राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत फळपिकांवरील किड - रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यस्थापन प्रकल्पा अंतर्गत केळी वरिल व किडी बाबत किड संरक्षक तसेच किड पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देउन शेतकऱ्यांचे मार्गदर्शन केले जाते. या शिवाय राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत केळी खोडापासून तयार केलेल्या मुल्यवर्धीत द्रावणाचा केळी पिकाच्या वाढीवर व उत्पादनावर संशोधनाचे काम नियमीत वेळेत चालु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्पातंर्गत २४ शासकीय आश्रमशाळांनी जुनीच क्रिडांगणाची किरकोळ दुरुस्ती करुन निधीत केलेला गैरव्यवहार**

**(३१) १११६५२ (२८-११-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवण (जि.नाशिक) येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्पातंर्गत २४ शासकीय आदिवासी आश्रमशाळांना क्रिडांगणासाठी लाखो रुपयांचा निधी देण्यात येवूनही संबधित विभागाने जुनीच

क्रिडांगणाची किरकोळ दुरुस्ती केली असून मिळालेल्या निधीत गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (१८-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी चौकशीत आढळून आलेले मुद्दे व त्यास अनुसरून केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे करण्यात आहे.

१. आश्रमशाळेत कबड्डी, खो-खो व व्हॉलीबॉलची क्रिडांगणे अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे खोदाई करून स्तर देवून विहित क्रिडांगणे तयार केले नसल्याचे प्रथम चौकशीत निर्दशनास आले आहे.

२. क्रिडांगणापोटी महसुल खात्याकडे रॉयल्टी भरण्यासाठी मुख्याध्यपकांना निर्देश देण्यात आलेले आहेत.तसेच उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (आदिवासी) कळवण यांना क्रिडांगण सपाटीकरण तपासणी करण्यास सूचित केले आहे.

३. संबंधित ठेकेदार, चेअरमन,परिवर्तन स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था मर्या. नाशिक यांना संबंधित आश्रमशाळेच्या मुख्याध्यपकांमार्फत रक्कम अदा करण्यात आली आहे.

४. विहित मुदतीत म्हणजे दि.३१ डिसेंबर, २०१८ पर्यंत काम पुर्ण न झाल्यास संबंधित ठेकेदारावर FIR दाखल करण्याचे स्पष्ट निर्देश मुख्याध्यापक यांना देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगांव) येथे एकलव्य पब्लिक स्कुल मंजूर करण्याबाबत**

**(३२) १११८९१ (०४-०४-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चोपडा (जि.जळगांव) येथे एकलव्य पब्लिक स्कुल मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ रोजी मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे पत्राव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) एकलव्य निवासी शाळा केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात येतात. त्यासाठी त्यांनी विहित निकष ठरवुन दिलेले आहेत. एकात्मिक आदिवासी प्रकल्प, यावल यांना सदर ठिकाणी भेट देवून पाहणी अहवाल सादर करणेबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी कळविले आहे. त्यानुसार एकात्मिक आदिवासी प्रकल्प, यावल यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर केंद्र शासनाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील पात्र शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्याबाबत

**(३३) ११३१०५ (०१-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करावा व आपले उत्पन्न वाढवावे यासाठी 'उन्नत शेती-समृध्द शेतकरी मोहिम २०१७' ही योजना सुरु केली, परंतु या योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेस लातूर जिल्हयातील अहमदपूर तालुक्यातील हडोळती येथील सोमनाथ हेंगणे पात्र ठरुन आणि सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन ६ महिने उलटल्यानंतरही या शेतकऱ्यास अनुदान प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेस पात्रता सिध्द करुनही अनुदान वाटप न करण्याची कारणे कोणती आहेत,
(४) तसेच लातूर जिल्हयामध्ये असे किती शेतकरी आहेत की जे पात्र असूनही त्यांना अनुदान वाटप झालेले नाही,
(५) असल्यास, पात्र शेतकऱ्यांना अनुदान तात्काळ वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिमे अंतर्गत-कृषी यांत्रिकीकरण उप- अभियानामध्ये पल्टी नांगर या औजाराचा समावेश नसतांनाही सदर औजारासाठी श्री. सोमनाथ हेंगणे, मु.हडोळती, ता. अहमदपुर, जि.लातुर त्यांना चुकीने पुर्वसंमती देण्यात आली. त्यांनतर त्यांचा अर्ज राष्ट्रीय फलोत्पादन योजनेत वर्ग करण्यात येवून त्यांना दि. २५.०३.२०१८ रोजी PFMS

प्रणालीद्वारे अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. तथापि, राष्ट्रीय फलोत्पादन योजनेत सुध्दा पल्टी नांगर अनुज्ञेय नाही. त्यामुळे या अनियमिततेसाठी जबाबदार असणाऱ्या सर्व अधिकाऱ्याकडून खुलासा मागवून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सुचना आयुक्त (कृषी) याना देण्यात आल्या आहेत. सन २०१८-१९ या वर्षापासून नांगरचा समावेश औजाराच्या यादीमध्ये करण्यात आला आहे.

(४) उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहिमेंतर्गत लातुर जिल्हयातील पुर्वसंमती प्राप्त यंत्रे/औजारांची खरेदी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजापूर तालुक्यातून (जि. रत्नागिरी) ३५ नळपाणी योजनांनी सौरऊर्जेवरील मीटर बसविण्याच्या प्रस्तावाबाबत

**(३४) ११३६२३ (०४-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर तालुक्यातून (जि. रत्नागिरी) ३५ नळपाणी योजनांनी सौरऊर्जेवरील मीटर बसविण्यासाठी महाऊर्जा विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास महाऊर्जा विभागाने मंजूरी दिली आहे काय,

(३) असल्यास, सौरऊर्जेवरील मीटर बसविण्याची प्रकिया कधीपर्यंत सुरु करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, किती वाडयांमध्ये नळ पाणी योजनांचा समावेश आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-११-२०१८) :** (१) रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या सौर ऊर्जेवरील मीटर बसविण्याचा प्रस्ताव नसून ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनेंतर्गत सध्या अस्तित्वात असलेल्या पंपाऐवजी सौर पंप बसविण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडून महाऊर्जाकडे सादर केला होता.

(२) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्याकडून प्राप्त प्रस्तावातील तांत्रिक व इतर निकष पूर्ण करीत असलेल्या ३ पंपांना महाऊर्जाने मंजुरी दिली आहे.

(३) राजापूर जि. रत्नागिरी येथे सौर ऊर्जेवरील मीटर बसविण्याचा कोणताही प्रस्ताव महाऊर्जा कार्यालयाच्या स्तरावर विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी (जि.परभणी) येथील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळावरील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३५) ११४१०८ (२१-०४-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) येथील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या कार्यालयासाठी पूर्णवेळ जिल्हा व्यवस्थापक नसल्याने कार्यालयाचा सर्व पदभार कंत्राटी पद्धतीने नेमलेले दोन कर्मचारी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे समाजातील लाभार्थ्यांना शासकीय योजनेपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पूर्णवेळ जिल्हा व्यवस्थापक व इतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. जिल्हा व्यवस्थापक, परभणी या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य जिल्हा व्यवस्थापकाकडे देण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मे.महालक्ष्मी अॅग्रो इंडस्ट्रिज धर्माबाद (जि.नांदेड) या शेतीवर आधारित उद्योगासाठी अन्न प्रक्रिया अभियानाअंतर्गत अनुदान मिळण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३६) ११६३४४ (०१-०४-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मे.महालक्ष्मी अॅग्रो इंडस्ट्रिज धर्माबाद (जि.नांदेड) या शेतीवर आधारित उद्योगासाठी अन्न प्रक्रिया अभियानाअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान प्रस्ताव सादर केल्यानंतर सदरहू प्रस्ताव नाकारल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडून सदरहू कंपनीस कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त उद्योग समुहाने विविध बँका व संस्थेकडून कर्ज घेतल्याने उद्योगावर अवलंबून असलेल्या १५० कामगार व ५०० शेतकरी कुटूंबावर उपासमारीची पाळी आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ नुसार सदरहू उद्योग समुहाला अनुदान देण्याबाबत अथवा अशा उद्योग समुहांसाठी नविन योजना कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मे. महालक्ष्मी ॲग्रो इंडस्ट्रिज धर्माबाद (जि. नांदेड) या प्रकल्पास राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान या योजनेंतर्गत मंजूरी देण्यात आली नव्हती. त्यामुळे सदर उद्योग समुहास अनुदान देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक २७.०३.२०१५ च्या पत्रान्वये दिनांक ३१.०३.२०१५ पासून सदर राज्य शासनास अर्थसहाय्य देणे बंद केल्यानंतर राज्य शासनाने उद्योग समुहासाठी दिनांक २० जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये “मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना” ही नवीन योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत पात्र उद्योगास कारखाना व यंत्र सामग्री आणि तांत्रिक नागरी बांधकामाच्या किमतीच्या ३०% कमाल मर्यादा रु. ५० लक्ष पर्यंत अनुदान देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील तळोजा औद्योगिक वसाहतीमधील समस्यांबाबत**

**(३७) ११७७२८ (०२-०८-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये प्रदूषण, पार्किंगकरिता वाहनतळ तसेच सक्षम अग्निशमन यंत्रणा नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आवश्यक सोईसुविधा तातडीने पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये महामंडळामार्फत सन २००७ मध्ये सुसज्य अग्निशमन केंद्र कार्यान्वित करुन सदर अग्निशमन केंद्रासाठी अग्निवाहने, कर्मचारी कार्यरत आहेत. पार्किग करिता महामंडळाने तळोजा औद्योगिक क्षेत्रात भूखंड क्रमांक पी-३१ क्षेत्रफळ १०.३७ एकर हा वाहनतळासाठी आरेखित केला आहे. सदर भूखंडावर वाहनतळाचा विकास करण्याचे काम बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर विकासकास निविदेद्वारे दिलेले होते व याबाबतचा सवलत करारनामा दिनांक २३/०६/२०११ रोजी झाला. भूखंडाचा ताबा जसे आहे त्या स्थितीत दिनांक १७/११/२०११ रोजी विकासकास देण्यात आला. तथापि, विकासकाद्वारे न्यायालयीन दावा दाखल करण्यात आला असून प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.

---

**पिंपळवटी (ता.पेठ, जि.नाशिक) येथील अनुदानीत आश्रम शाळेत विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृह बांधण्याबाबत**

**(३८) ११८३६९ (२६-०७-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळवटी (ता.पेठ, जि.नाशिक) येथील अनुदानित आश्रमशाळेत विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृह नसल्याने विदयार्थी वर्ग खोल्यातच झोपतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या त्रुटींच्या संदर्भात शासनाने संस्थेस नोटीस पाठविली असून त्याअनुषंगाने संस्थेने उत्तर दिले आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२८-११-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

विद्यार्थीनीसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था आहे, मात्र इयता १ ली ते ७ वी च्या विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था वर्ग खोल्यामध्ये करण्यात आली आहे.

(२) व (३) या संदर्भात संस्थेला लेखी सुचना देण्यात आली असुन संस्थेने या शैक्षणिक वर्षाअखेर मुलांच्या वसतीगृहाचे बांधकाम पुर्ण करण्याची लेखी हमी दिली आहे. संस्थेने या बाबीची पुर्तता न केल्यास संस्थेचे अनुदान रोखण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दिव्यांग मुलांना शिक्षण देणा-या अनेक शाळांमध्ये अनेक शिक्षकांची व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत.**

**(३९) ११८७६२ (०४-०८-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग मुलांना शिक्षण देणा-या अनेक शाळांमध्ये अनेक शिक्षकांची व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आकृतिबंधानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नसल्यामुळे दिव्यांग मुलांकडे लक्ष देता येत नाही व गुणवेत्तवर देखील परिणाम होत असून शिक्षक व अन्य कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) व (२) होय
(३) शिक्षक व अन्य कर्मचाऱ्याची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरबाड (जिल्हा ठाणे) तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांनी संगमताने केलेला गैरव्यावहार**

**(४०) ११९९१० (३१-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांनी सन २०१५ ते २०१८ या कालावधीत विविध प्रकारच्या कामामध्ये गैरव्यावहार केला असुन त्या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची व संबंधित कामाची त्रयस्थ सक्षम अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कृषी अधिकारी यांनी केलेल्या कामाच्या गैरव्यावहारबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१८) :** (१) विभागीय कृषि सह संचालक, कोकण विभाग, ठाणे यांच्या कार्यालयास सदरची तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) होय, सदर प्रकरणी उप विभागीय कृषि अधिकारी, कल्याण, जिल्हा ठाणे यांनी चौकशी पूर्ण केली आहे. त्यानुसार सदर कामे समाधानकारक पूर्ण झाली असून, त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या गंभीर त्रुटी आढळून आलेल्या नाहीत. त्यामुळे याप्रकरणी कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील तंत्रशिक्षण महाविद्यालयांना देण्यात येणारे शुल्क**
**समाज कल्याण विभागाकडून अद्याप न मिळाल्याबाबत**

**(४१) १२०२६९ (०४-०८-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बहुतांश तंत्रशिक्षण महाविद्यालयांमधील राखीव गटातील विद्यार्थ्यांना दरवर्षी साधारणत: माहे ऑक्टोबरच्या दरम्यान मिळणाऱ्या शुल्काचा परतावा तसेच तंत्रशिक्षण

महाविद्यालयांना देण्यात येणारे शुल्क सामाजिक न्याय विभागाकडून अद्याप मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शुल्क परतावा वेळेत न मिळाल्यामुळे प्राध्यापक व कर्मचारी वर्गाचे वेतन देण्यात अडचणी येत असल्याबाबतचा मुद्दा संस्थाचालकांनी मांडला आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, न्यायालयानेही शुल्क परतावा देण्याबाबत आदेश देवूनही अद्यापपर्यंत शुल्क अदा करण्यात आलेले नसून सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही,
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सरवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत

**(४२) १२०६९८ (०२-०८-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील मंजूर बांधकामाच्या इमारती जवळच्या मोकळया जमिनीवर अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे मे, २०१८ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-११-२०१८) :** (१) होय, महामंडळाच्या प्रतिनिधीतर्फे नियमीत पाहणी दरम्यान सदर बाब मे, २०१८ पूर्वी निदर्शनास आली आहे.
(२) म.औ.वि.म. च्या कल्याण- भिंवडी औद्योगिक क्षेत्रामधील महामंडळाने वाटप केलेल्या भूखंडांवर भूखंडधारकांनी मंजूर बांधकाम व्यतिरीक्त मोकळया जागेत (Marginal Space) केलेल्या अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याकरीता महामंडळातर्फे नोटिसेस पाठविण्यात आल्या आहेत तसेच सदर नोटिसेस भूखंडधारकांकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे व भूखंडावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित न केल्यामुळे महामंडळातर्फे MRTP Act - १९६६ अंतर्गत सुद्धा नोटिसेस पाठविण्यात आलेल्या आहेत. औद्योगिक क्षेत्रामधील भूखंडावरील अनधिकृत बांधकामांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि.म. यांचे दालनात दि. ०४/०७/२०१८ रोजी औद्योगिक क्षेत्राच्या प्रतिनीधींसोबत बैठक झाली, सदर बैठकीमध्ये ठरवल्यानुसार मुख्य अग्निशमन अधिकारी व मुख्य नियोजक यांचे सोबत दि. १८/०७/२०१८ रोजी मुख्यालय, अंधेरी

येथे पुनश्च: बैठक झाली. सदर बैठकीमध्ये भूखंडावरील मोकळया जागेमध्ये असलेल्या अनधिकृत बांधकामाचे भूखंडनिहाय तपशिलावर सर्वेक्षण करणे आवश्यक असल्याचा निर्णय झाला. सरवली (ता.भिंवडी, जि.ठाणे) कल्याण- भिंवडी औद्योगिक क्षेत्र ७२.४४ हेक्टर व ६१ भूखंडावरील अनधिकृत बांधकामाचे तातडीने सर्वेक्षण करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असून सर्वेक्षणाचे काम २० ते ३० दिवसांचा कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येत आहे. कल्याण-भिंवडी औद्योगिक क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाच्या सर्वेक्षणानुसार कोणती अनधिकृत बांधकामे दंडात्मक शुल्क भरून घेवून, नियमित करणे शक्य आहे या संबंधीचा व उर्वरीत बांधकामे निष्कासित करणेबाबत व डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाच्या सर्वेक्षणाचे काम स्वतंत्र प्रस्तावास मंजूरी घेवून हाती घेण्यात येत आहे.
(३) लागू नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील अपंग वित्त व विकास महामंडळाकडून प्राप्त निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(४३) १२२२३१ (३०-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयातील अपंग वित्त व विकास महामंडळाकडून विविध प्रकारच्या १४ प्रकरणांचा निधी गत दोन वर्षापासून जिल्हा कार्यालयाला वर्ग करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाच्या दुर्लक्षपणामुळे अपंगांना कर्ज मिळण्यासाठी कार्यालयात सातत्याने फेऱ्या मारावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने कामकाजात दुर्लक्षपणा करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) व (२) वित्तीय वर्ष २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये जिल्हा कार्यालय उस्मानाबाद येथे लाभार्थ्यांचा निधी हस्तांतरित करण्यात आला असून सदर निधीचे वेळेत पूर्णपणे वाटप झालेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागांतर्गतच्या दिव्यांगांच्या शाळा व कार्यशाळा यांना कायमस्वरुपी विनाअनुदान तत्त्वावर अनुदान देण्याबाबत

**(४४) १२२२५० (३०-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सामाजिक न्याय विभागातंर्गत असलेल्या दिव्यांगांच्या शाळा व कार्यशाळा शासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे कायमस्वरुपी बंद होण्याच्या मार्गावर आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २००४ मध्ये कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या या शाळांना गत १४ वर्षांपासून अद्यापपावेतो शासनामार्फत कोणतेही अनुदान देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या शाळांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) व (२) नाही.

(३) शासन निर्णय दिनांक ८.४.२०१५ अन्वये कार्यरत असलेल्या १२३ विनाअनुदान तत्वावरील शाळा/कर्मशाळांना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. तथा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदनिर्मितीची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जास्त क्षमतेची शीतगृहे उभारण्याबाबत

**(४५) १२२३२९ (२५-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शीतगृहांअभावी सुमारे ३० टक्के शेतमालाची नासाडी होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅशनल सेंटर फॉर कोल्ड चेन डेव्हलपमेंट च्या अहवालावरुन महाराष्ट्रात ६२.७३ लाख मेट्रिक टन क्षमतेच्या शीतगृहांची आवश्यकता असतांना केवळ ९.७९ लाख क्षमतेची शीतगृहे आतापर्यत उभारण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जास्त टन क्षमतेची शीतगृहे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया मंत्रालय (MOFPI) यांनी CIPHET (Central institute of post-harvest Engineering and Technology, Ludhiana) या संस्थेस अन्नामध्ये होणारी नासाडी यांचा अभ्यास करण्याकरीता सुचीत केले होते. त्यानुसार २०१५ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार फळे व भाजीपाल्यामध्ये ४.५८ ते १५.८८ टक्के काढणी पश्चात नुकसान होते.
(२) NCCD (National Centre for cold chain development) यांच्या Overview on cold chain development (२०१५) च्या अहवालात महाराष्ट्र राज्यात एकूण ७,६२,७९७ मे.टन शितगृह क्षमता निर्माण झालेली आहे व अजुन १,५७,७०९ मे.टन क्षमता निर्माण करणेची गरज आहे असे नमुद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे पनवेल जि. रायगड येथे ५००० मे.टनाचे शितगृह साठवणूकसाठी उपलब्ध आहे. याशिवाय राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत राज्यात ९ ठिकाणी एकून ९००० मे.टन साठवणूक क्षमता निर्माण करण्याचे वखार महामंडळाचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या महामंडळातर्फे कर्ज व अनुदान न देण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत**

**(४६) १२४२४० (०२-०८-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दलित समाजातील विविध घटकांतील जातींनी मुख्य प्रवाहात यावे, त्याचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी ४० वर्षापूर्वी स्थापन केलेल्या महामंडळातर्फे यापुढे कोणत्याही प्रकारचे कर्ज आणि अनुदान न देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळातर्फे उद्योगासाठी कर्ज व अनुदान दिले जात असून, सदर कर्जाची वसूली होत नाही या कारणास्तव कोणत्याही प्रकारचे कर्ज न देण्याचा निर्णय घेतल्यामुळे दलित समाजातील बेरोजगारांना महामंडळाचा आर्थिक लाभ घेण्यात अनेक अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महामंडळातर्फे कर्ज व अनुदान न देण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयात सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्याबाबत**

**(४७) १२४४३९ (०२-०८-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाअंतर्गत सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीचे दोन हजार अर्ज प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शाळा स्तरावर वारंवार पाठपुरावा करुनही याकडे शासनाचे जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-११-२०१८) :** (१) अशंत: खरे आहे.

(२) हे खरे नाही,

(३) शिष्यवृत्ती योजनेसाठीचे महाईस्कॉल पोर्टल हे करार संपुष्टात आल्याने माहे एप्रिल २०१७ पासून डिसेंबर २०१७ पर्यंत बंद होते. तद्नंतर सदर पोर्टल पुनर्जिवित करण्यात येवून, सन २०१७-१८ मधील सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत हिंगोली जिल्हा परिषद समाजकल्याण विभागांतर्गत ११५३७ प्रलंबित अर्ज माहे मार्च २०१८ अखेरपर्यंत निकाली काढण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील भूविकास बॅकेच्या कर्मचाऱ्यांनी थकीत देणी देण्याबाबत**

**(४८) १२४६०३ (०३-०८-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील भूविकास बॅकेच्या कर्मचाऱ्यांनी थकीत देणी मिळावीत याकरिता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रोपांचे वाटप करुन आंदोलन सुरु करुन देखील एकही अधिकारी आंदोलनाकडे न फिरकल्यामुळे भूविकास बॅंकेच्या सेवानिवृत्त्त कर्मचाऱ्यांनी मा.राज्यपाल यांच्याकडे पत्राद्‌वारे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी थकीत देणी न मिळाल्यास दिनांक ५ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास राजभवनासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भूविकास बॅंकेच्या कर्मचाऱ्यांची थकीत देणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२८-११-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) व (४) भूविकास बँकेबाबत दिनांक २४.०७.२०१५ रोजी घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयास अनुसरुन भूविकास बँक, कोल्हापूर या बँकेच्या मालमत्तेची अपसेट प्राईज निश्चित करण्यात आली असून त्यानुषंगाने ई-टेंडरींगची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील गावांचा पेसा कायद्यात समावेश करण्याबाबत**

**(४९) १२५१३९ (२६-०७-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयाच्या साक्री तालुक्यातील सुमारे ६० गावांचा ज्या गावांची लोकसंख्या ७० टक्के पेक्षा जास्त आदिवासी आहे अशा गावांचा पेसा कायद्यात अद्याप समावेश झालेला नसल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.मुख्यमंत्री तसेच आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक ३१ जानेवारी, २०१८, २६ मार्च, २०१८, १० ऑगस्ट, २०१८, १० ऑक्टोबर, २०१८ रोजी वेळोवेळी निवेदन सादर करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२८-११-२०१८) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

मा. श्री डी.एस अहिरे, विधानसभा सदस्य, साक्री यांनी वेळोवळी निवेदने दिली आहेत.

(३) सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील गावांपासून नव्याने निर्माण झालेल्या गावांचा तसेच आदिवासी लोकसंख्या ५० % पेक्षा जास्त असलेल्या व आदिवासी उपयोजना क्षेत्रास भौगोलीक दृष्ट्या संलग्न असलेल्या गावांचा अनुसूचित क्षेत्रात समावेश करण्यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याचे काम आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या स्तरावर अंतिम टप्प्यात आहे. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून शासनास प्राप्त झाल्यावर केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यात औषधी वनस्पतीचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(५०) १२५६४६ (०१-०८-२०१८). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रामध्ये औषधी वनस्पतीची लागवड करणारे १००० हजार शेतकरी असून सन २०१७-१८ मध्ये ७०० ते ८०० हेक्टर क्षेत्र असुन औषधी वनस्पतीचे अनुदान प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारत सरकार आयुष मंडळाकडून महाराष्ट्र आयुष मंडळास अनुदान प्राप्त झाले असूनही औषधी वनस्पती उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषधी वनस्पती उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

आयुष मंडळाकडून निधी प्राप्त न झाल्याने शेतकऱ्यांची निवड करुन त्यांना लक्षांक देण्यात आला नव्हता. सबब, कोणत्याही शेतकऱ्याचे अनुदान प्रलंबित राहण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.